सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज...३३..ठ. क्र....२५ दि..९/२४.८.१७.....रोजी ठेवता आलेला प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

जून २०१७

नगर रचना विभागाकडील विविध प्रकारचे दाखले, भाग नकाशा, अकृषिक परवानगी (विकसन परवानगी), जमीन विकास छाननी शुल्क, टी.डी.आर. व एफ.एस.आय.इ. शुल्क वाढीव दराबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव प्रस्तावात नमूद सर्व बाबीचे अवलोकन होऊन स्मार्ट सिटी सोलापूर शहर विकासाच्या दृष्टीकोनातून तसेच सध्याची महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता नगर रचना विभागाकडील प्रस्तावासोबतच्या तक्त्यात नमूद तपशीलानुसार वाढीव दरास मा. स्थायी समिती मान्यता मिळून सदरचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २९-४-१७ चे टिपणीने आलेल्या प्रकरणी मा. स्थायी समिती ठराव क्र. ४०, दिनांक २०-५-१७ चे शिफारशीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

शहरातील मंजूर झालेल्या लेआऊटमधील खुली जागा व रस्ते किती ताब्यात घेतलेले आहेत त्याची यादी देणेत यावी ? पैकी किती जागांवर अतिक्रमण झालेले आहे यासंदर्भामध्ये कोणती कार्यवाही करणेत आलेली आहे ?

टी.डी.आर. देऊन किती जागा ताब्यात घेतल्या आहेत ? जादा एफ.एस.आय. किती जागासाठी देण्यात आलेला आहे या संपूर्ण माहितीसह मा. सर्वसाधारण सभेकडे माहितीस्तव पाठविण्यात यावे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ३४ ठ. क्र. ३०
दि. १२/६/१७ रोजी ठेवता आलेला प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

दयानंद कॉलेज पाठीमागून ते नटराज तमाशा थिएटर पर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे कामाबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सदरचे काम तातडीने हाती घेणे आवश्यक असल्याने मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये म.न.पा.कडे अशा प्रकारची कामे करणारे मक्तेदार अर्ष कन्स्ट्रक्शन यांचेकडून पूर्वगणनपत्रक दराने (पू.ग.पत्रक र.रुपये २३,६२,४४०/-) करुन घेणेस, मक्तेदार यांना वर्कऑर्डर देणेस व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा. स्थायी समिती मार्फत मा. सर्वसाधारण सभेसमोर सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक २०-५-१७ चे टिपणीने आलेल्या प्रकरणी मा. सर्वसाधारण सभेकडे माहितीस्तव सादर करणेकामी मा. स्थायी समिती ठराव क्र. ४३, दिनांक ३-६-१७ चे शिफारशीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ.३५...ठ. क्र......३९
दि.२४/८/१८.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

मा. पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांच्या पोलीस डान्स कॅम्पचे अनुषंगाने कार्यक्रमानिमित्त नाटयगृह विनामुल्य उपलब्ध करुन देणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सन १९८४ पासून सांस्कृतिक केंद्र अशी ओळख असलेल्या हुतात्मा स्मृती मंदिर नाटयगृहाच्या शर्ती व अटी मा. सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या आहेत. तसेच नाटयगृह व्यावसायिक वर्गात येत असलेने वार्षिक उत्पन्नाचे टार्गेट ठरवून देण्यात आलेले आहेत. मा. पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांच्या कार्यक्रमास विनामुल्य उपलब्ध करुन दिलेस सोलापूर महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे. तसेच भविष्यात इतरही नाटय संस्था, सामाजिक संघटना यापध्दतीची सुट मागण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे समान न्यायाच्या दृष्टीने अडचणीचे ठरणार आहे. तथापि मा. पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांचे दिनांक ४-५-१७ रोजी सायं. ६ ते ९ या वेळेसाठी विनामुल्य उपलब्ध करुन द्यावयाचे असल्यास यासाठी सक्षम मान्यतेसाठी मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणे इष्ट होईल. तरी सदर विषय मान्यतेसाठी मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करावे किंवा कसे याबाबत व्यवस्थापक हुतात्मा स्मृती मंदिर यांनी मा. आयुक्त यांचेकडे निवेदन सादर केले असता माननियांनी **जी.बी.समोर सादर करावे** असे आदेश दिलेले असून, मा. आयुक्त यांचे दिनांक १२-५-१७ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

प्रस्तुत प्रकरणी मा. महानगरपालिकेने जे दर निश्चित केलेले आहेत त्या दरानुसार भाडे आकारणेची कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

(सही)
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 36 ठ. क्र. 32
दि. 23/6/17 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला

संत शिरोमणी श्री सावता माळी शेतकरी आठवडे बाजार भरविणेसाठी महानगरपालिका अंतर्गतच्या कर्णिक नगर चिल्ड्रन पार्क शेजारील व उत्तरमुखी मार्केट शाहीर नगर येथील जागा कृषी पणन मंडळास वापरण्यास उपलब्ध करुन देणेकामी प्रस्तावात नमूद कारणास्तव कर्णिक नगर चिल्ड्रन पार्क शेजारील एकूण क्षेत्र ४०००.०० चौ.मि. जागा व उत्तरमुखी मार्केट शाहीर नगर येथील एकूण क्षेत्र २०००.०० चौ.मि. जागा सोलापूर महानगरपालिका मार्फत विनामुल्य आठवडयातून एकदा शनिवार किंवा रविवार ११ महिन्याच्या कालावधीकरिता मा. आयुक्त यांच्या शर्ती व अटीस अधिन राहून सदरचे मोकळे मैदान पणन या खात्यास मा. शासनाच्या मार्गदर्शन तत्वाप्रमाणे वापरण्यासाठी उपलब्ध करुन देण्यास तसेच सदर योजनेसाठी महाराष्ट्र शासन वेळोवेळी पारित होणारे शासन निर्णयाप्रमाणे व सदर योजनेसाठी मा. जिल्हा कृषी अधिकारी, पणन विभाग, पुणे यांच्यामार्फत मागणी करण्यांत येणा-या विविध सोलापूर महानगरपालिकेचे मालकीचे मोकळे जागा व मैदाने वापरण्यास उपलब्ध करुन देण्यासंबंधी अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करणेस, मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. २९-५-१७ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

संबंधित शेतक-यास प्रस्तावामधील उत्तरमुखी मार्केट शाहीर नगर ही जागा देणेत येऊ नये. फक्त कर्णिक नगर चिल्ड्रन पार्क शेजारील एकूण क्षेत्र ४०००.०० चौ.मि. जागा प्रती एका टेंटला (१०X१० स्वे.फूट) १००/- रुपये प्रमाणे भाडे आकारणी करुन जागा शर्ती व अटीनुसार वापर करणेस मान्यता देणेत येत आहे.

(सही)
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 34 ठ. क्र. 32
दि. ९.२५.८.९५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

श्री. सुहास वासुदेव जोशी रा. १५८, दक्षिण कसबा, सोलापूर यांना कॅन्सरचा आजार झाला असून, त्यांच्यावर इनलॅक्स ॲन्ड बुधराणी हॉस्पीटल, पुणे येथे उपचार केले असून, रुपये १,४०,०००/- इतका खर्च आला आहे. सदर आजारावर उपचार करणेकरिता कर्ज काढून उपचार करणेत आलेले आहे. श्री. सुहास वासुदेव जोशी हे खाजगी नौकरी करीत असून त्यांची घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची व हालाकिची असल्यामुळे सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने जास्तीत जास्त वैद्यकीय आर्थिक मदत मिळणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

[signature] E.P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज...35...ठ. क्र......38
दि...१२.०९.१५... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सोलापूर प्रभाग क्र. ९ कर्णिक नगर शेजारील स्वातंत्र्य सैनिक नगर येथील बांधण्यात आलेली अभ्यासिका श्री. सिध्देश्वर सार्वजनिक वाचनालय सोलापूर ही संस्था शासनमान्य असून, ग्रंथालयात आठ हजार ग्रंथ व ११ वर्तमानपत्र तसेच २५ मासिके वाचकासाठी उपलब्ध आहेत. तरी श्री. सिध्देश्वर सार्वजनिक वाचनालय सोलापूर या नोंदणीकृत सेवाभावी संस्थेस वाचनालय चालविणेसाठी २९ वर्ष ११ महिने म.न.पा.च्या नियमानुसार अभ्यासिका भाडयाने देणेकामी मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

याप्रकरणी मा. सहा. सहा. संचालक नगर रचना, अधिक्षक, भूमी व मालमत्ता, मा. नगरअभियंता व मा. आयुक्त यांचे अभिप्रायासह प्रकरण सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ३९ ठ. क्र. ३५ दि. १२/०५/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

प्रभाग क्र.१२ मधील रहिवाशी श्री. रामगोपाल लक्ष्मण विडप, राहणार - ९/९१ रविवारपेठ, सोलापूर ह्यांचे नावे असलेला प्लॉट नं.७ नागलक्ष्मी नगर बोळकोटे विट भट्टी शेजारी कारखाना असून त्याठिकाणचे वॉचमन खोली व सूताची स्टोअर रुम हे अचानक आग लागून मोठया प्रमाणावर नुकसान झालेले आहे, यामध्ये अन्नधान्य, घरगुती सामान, सोननाणं, रोख रक्कम, गॅसशेगडी तसेच इतर काही महत्वाचे कागदपत्रे जळून खाक झालेले आहेत. तसेच रंगणी केलेले सूत, वॉईस वेस्टेज सूत, टॉवेलचे नवीन तुकडे, इलेक्ट्रीक बोर्ड, मीटर, वायरी वगैरेदेखील जळून खाक झालेले आहेत. सदर वस्तुंचा पंचनामा केला असता जवळ जवळ ३,१३,५००/- इतके आर्थिक नुकसान झालेले आहे. सदर आगीमुळे त्यांची आर्थिक परिस्थिती देखील बिकट झालेली आहे ते कष्टकरी नागरीक असल्याने त्यांना पुन्हा त्यांचा संसार उभा करणे वा घरगुती आवश्यक ती सर्व साहित्य खरेदी करु शकत नाहीत किंवा त्यांची ऐपतदेखील नाही. वरील घटनेमुळे त्यांचे कौटुंबीक जीवन उध्वस्त झालेले आहे. त्यांचे व्यापारात देखील नुकसान झालेले आहे. बाहेरील ओळखीपाळखीच्या लोकांकडून हात उसने घेऊन काही मोजक्या वस्तु घेऊन सध्या ते आपला चरितार्थ चालवित आहेत.

तेंव्हा वरीलप्रमाणे परिस्थिती पाहता श्री. रामगोपाल लक्ष्मण विडप यांना त्यांचे वरील प्रमाणे झालेले नैसर्गीक नुकसान भरपाई म्हणून वा एखादे गरीब कुटुंबाची नाहक हानी झाल्याने त्यांना मदत म्हणून महापालिकेकडून जास्तीत जास्त आर्थिक मदत देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/नामुली/विशेष
सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.ज..४१..ठ. क्र.....३६
दि..२१/९/१५...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सोलापूर महानगरपालिकेचे विद्यमान नगरसेवक श्री. तौफिक इस्माईल शेख हे असून, हे सोलापूर महानगरपालिकेच्या पहिल्या सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित राहून सभेत सहभाग नोंदविले आहेत. त्यानंतर त्यांचे विरोधात पोलिसांनी एम.पी.डी.ए. कायद्यान्वये कार्यवाही करुन त्यांना स्थानबध्द केले आहेत. सद्य ते स्थानबध्दतेत असून, त्यामुळे त्यांना पुढील सो.म.पा.च्या सर्वसाधारण सभेत भाग घेता आले नाही. सदस्य श्री. तौफिक शेख हे या स्थानबध्दतेच्या विरोधात आवश्यक त्या मे. कोर्टात दाद मागितले असून, मे. कोर्टाकडून याबाबत जरुर तो निर्णय अपेक्षित आहे. यास्तव त्यांना महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील तरतूदीनुसार त्यांना मा. सर्वसाधारण सभेस अनुपस्थित राहण्यास मान्यता देणेत येत आहे.

Sd/- P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४९ ठ. क्र. ३०
दि. ९-२५-८-१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सोलापूर महानगरपालिकेच्या विधान सल्लागारपदी कार्यरत असलेले श्री. सोनटक्के हे चुकीचे निर्णय घेत असून, त्यांनी वेळोवेळी महानगरपालिकेतील हद्दवाढ विभागातील कामगारांच्या बाबतीत अभिप्राय देताना दुटप्पी भूमिका घेऊन, मा. शासनाची दिशाभूल करीत आहेत. त्यामुळे हद्दवाढ कर्मचा-यांचे आर्थिक नुकसान होत आहे. त्यांना पेन्शन, पदोन्नती वगैरे मिळणे आवश्यक असताना त्यांनी अनेक वेळेस चुकीचे अभिप्राय दिलेले आहेत. त्यामुळे महानगरपालिकेचे तसेच हद्दवाढ कर्मचा-यांचे आर्थिक नुकसान होत आहे. अशा अकार्यक्षम विधान सल्लागार यांची बडतर्फी करुन त्यांचेकडून मनपाचे आर्थिक नुकसानीस जबाबदार धरुन त्यांच्याकडून झालेली नुकसान भरपाई त्वरीत वसूल करण्यास व बडतर्फीस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

माहे एप्रील २०१७ चे सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र. ९, ठराव क्र. ११, दिनांक ५-७-२०१७ अन्वये निर्णय झालेला असल्याने त्याप्रमाणे कार्यवाही ठेवणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र./ज. 82 ठ. क्र. 38
दि. [illegible] रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सोलापूर येथील श्रीमती रियाजबी निसारअहमद पटेल रा. १३, सुमय्या सोसायटी, नई जिंदगी सोलापूर यांना छातीचा कॅन्सर झालेला आहे. त्यांची परिस्थिती हालाकिची असून औषधोपचारासाठी त्यांच्याकडे पैसे नाहीत. या प्रस्तावासोबत त्यांचे सर्व वैद्यकीय दाखले जोडलेले असून, त्यांना महानगरपालिकेच्या वतीने मदत म्हणून जास्तीत जास्त अनुदान देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner